# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
**दूरध्वनी क्र.** ०२२-२२१६३९६४/६५/६९ **फॅक्स क्र.** ०२२-२२१६३९७६
**ई-मेल** : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेत-स्थळ** : www.mercindia.org.in/www.merc.gov.in

जाहिरात क्र. ०४/२०१८-१९

## जाहीर सूचना

**महाराष्ट्रातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पुर्ततेची पडताळणी करण्यासाठी आयोगाने सुरु केलेल्या कार्यवाहीसंबंधी जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत**

नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन (आरपीओ), त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन विनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) राज्यातील वितरण परवानाधारकांनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी वार्षिक तत्वावर करीत असतो. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ने सादर केलेल्या माहितीच्या आधारे, आयोगाने, खालील प्रकरणांमध्ये राज्यातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी करण्यासाठी कार्यवाही सुरु केली आहे व वितरण परवानाधारकांना त्यांच्या आर्थिक वर्ष २०१६-१७ साठीच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेची तपशीलवार माहिती आयोगास देण्याचे निर्देश दिले आहेत.

| अनु. क्र. | वितरण परवानाधारक | प्रकरण क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | सन २०१७ चे प्र.क्र.२०७ |
| २ | बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम | सन २०१७ चे प्र.क्र.२०८ |
| ३ | टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (वितरण) | सन २०१७ चे प्र.क्र.२०९ |
| ४ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (वितरण) | सन २०१७ चे प्र.क्र.२१० |
| ५ | इंडियन रेल्वे | सन २०१७ चे प्र.क्र.२११ |
| ६ | माईंडस्पेस बिझनेस पार्क प्रा.लि. | सन २०१७ चे प्र.क्र.२१२ |
| ७ | गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि. | सन २०१७ चे प्र.क्र.२१३ |

त्यानुसार वितरण परवानाधारकांनी सविस्तर माहिती आयोगास सादर केली असून या माहितीची एक प्रत, 'महाऊर्जा' ने सादर केलेल्या माहितीसह, आयोगाच्या www.merc.gov.in/www.mercindia.org.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

वितरण परवानाधारकांनी व महाऊर्जाने सादर केलेल्या माहितीवर, आयोग जनतेकडुन अभिप्राय, सूचना आणि हरकती लेखी मागवित असुन त्या सहा (१+५) प्रतींमध्ये आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५ येथे व्यक्तिश: किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स: ०२२-२२१६३९७६. ई-मेल : mercindia@merc.gov.in) द्वारा या पत्त्यावर **बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१८** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

सदर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती पाठविणाऱ्याने त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि, असल्यास, ई-मेलचा उल्लेख करावा. हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने पाठविण्यात येत असतील तर तसे त्यात नमूद करण्यात यावे. तसेच सूचना व हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिस आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर ते देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला, आयोगाकडून, **गुरूवार, दि. १२ जुलै, २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता, आयोगाच्या १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई, ४०० ००५** या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१८** रोजी किंवा त्यापुर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती आयोगाकडून आदेशास अंतिम स्वरूप देण्यापुर्वी विचारात घेण्यात येतील.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २० जून, २०१८

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size 8 X 23**